अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल) कार्यालय,
पुणे महानगरपालिका
जा.क्र. अतिमआ(ज)/साप्र/आस्था/३०४९
दिनांक-२७/०६/२०१८

## कार्यालयीन आदेश

**विषय –** पुणे महानगरपालिका मुख्य इमारतीतील विविध विभागातील माहे मे २०१८ मध्ये केलेल्या दैनंदिन हजेरी तपासणीबाबत.

**संदर्भ –** कार्यालयीन आदेश जा.क्र.अतिमआ(वि)/उआ(साप्र)/३१७ दि.१४.०६.२०१७

पुणे महानगरपालिका मुख्य इमारतीचे विविध विभागातील माहे मे २०१८ मध्ये वेळोवेळी हजेरी पत्रकाची तपासणी केली असता, बहुतांश कार्यालयातील कर्मचारी हे कार्यालयीन वेळेत उपस्थित राहत नसल्याचे उप आयुक्त, सामान्य प्रशासन यांनी सादर केलेल्या अहवालावरून निदर्शनास येत आहे.

मा.महापालिका आयुक्त, मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त, यांनी वेळोवेळी बायोमेट्रिक हजेरी व कार्यालयीन उपस्थितीबाबत संदर्भांकित आदेशान्वये तसेच वेळोवेळी कार्यालयीन परिपत्रके प्रसृत करून सुध्दा त्याची प्रभावी अंमलबजावणी मनपा भवनातील खातेप्रमुख/विभागप्रमुख तसेच महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय स्तरावर केली जात नसल्याचे दिसून येते. बहुतांश अधिकारी/कर्मचारी कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपस्थित राहत नसल्याने नागरीकांना त्यांची प्रतिक्षा करावी लागत असून त्यामुळे नागरीकांमध्ये प्रशासनाबाबत नकारात्मक प्रतिमा निर्माण होत आहे.

कार्यालयीन कामकाजाची वेळ व मनपा कर्मचाऱ्यांची उपस्थिती या बाबत कार्यालयीन शिस्तीचे काटेकोरपणे पालन होणेसाठी बायोमेट्रिक हजेरी पध्दतीची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. या बाबत यापूर्वीही कार्यालयीन आदेशाव्दारे सर्व मनपा अधिकारी/कर्मचारी यांनी कार्यालयामध्ये वेळेवर हजर राहणेबाबत वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापी अद्यापही अनेक कार्यालयांमध्ये अधिकारी/कर्मचारी उशिरा उपस्थित होत असल्याचे दिसून येत आहे. या संबंधी वेळोवेळी प्रसृत करण्यात आलेले कार्यालयीन आदेश/परिपत्रके यांची सर्व खातेप्रमुख/विभागप्रमुख यांनी नोंद घेणे आवश्यक आहे.

तरी सर्व खातेप्रमुख/विभागप्रमुख यांना या कार्यालयीन आदेशान्वये निर्देश देण्यात येत आहे की, बायोमेट्रिक हजेरी व कार्यालयीन उपस्थितीची प्रभावी अंमलबजावणी होणेकरीता, त्यांचे अखत्यारीतील उशीरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांवर वेळोवेळी प्रसृत करण्यात आलेल्या कार्यालयीन आदेशात नमूद करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार कारवाई करणेत यावी.

25.06.18

**(शीतल तेली-उगले)**
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल)**
**पुणे महानगरपालिका**

प्रति,
सर्व खातेप्रमुख,
सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त
पुणे महानगरपालिका

यांजकडेस पुढील कार्यवाहीसाठी...

प्रत,
मा.महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका
मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त(वि/ई)
पुणे महानगरपालिका यांजकडेस माहितीस्तव...